ग्रंथमालिका ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र’ : देवपूजा – खंड ४

# देवपूजेपूर्वीची सिद्धता (शास्त्रासह)

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

**श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**

**श्री. निषाद श्याम देशमुख आणि अन्य**




## सनातन संस्था


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या संदर्भातील अद्वितीय कार्य !



१. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष आणि कार्यारंभ (वर्ष १९९८)

२. हिंदु राष्ट्र, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर ग्रंथ-निर्मिती

३. हिंदूंना धर्मशिक्षण देणे, हिंदु धर्मरक्षण आणि हिंदु राष्ट्र-स्थापना यांविषयी हिंदूंचे प्रबोधन करणे, यांसाठी नियतकालिक ‘सनातन प्रभात’ मधून मार्गदर्शन

४. हिंदु राष्ट्राची छोटी प्रतिकृती असणाऱ्या सनातन आश्रमांची निर्मिती

५. साधनेचा संस्कार दृढ झालेले सहस्रो धर्मप्रसारक सिद्ध करणे

६. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन अन् त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन

७. भावी हिंदु राष्ट्राचे दायित्व सांभाळण्यासाठी पुढील पिढ्यांना सक्षम करणे

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

# सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्यांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



श्री. निषाद श्याम देशमुख

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. ते एखादी घटना, धार्मिक विधी, यज्ञयाग आदींचे सूक्ष्म-परीक्षणही करतात. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्यांना आसुरी शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


卐 मनोगत ७

卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ९

१. देवपूजेसंबंधीची पंचकर्मे १३

२. देवपूजेची सिद्धता (अर्थ, महत्त्व, लाभ आणि क्रम) १३

३. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेची (तयारीची) प्रत्यक्ष कृती १५

४. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेच्या संदर्भातील कृतींमागील शास्त्र २०

४ अ. स्तोत्रपठण किंवा नामजप करणे २०

४ आ. पूजास्थळाची शुद्धी अन् पूजेच्या उपकरणांची जागृती करणे २२

४ इ. रांगोळी काढणे २५

४ इ ३. देवतेच्या तत्त्वाशी संबंधित रांगोळी का काढावी ? २६

४ इ ४. रांगोळी काढल्यावर तिच्यावर हळदी-कुंकू का वहावे ? २८

४ ई. शंखनाद करणे २९

४ उ. आसनग्रहण ३४

४ ऊ. आचमन करणे ३८

४ ए. देवतांवरील निर्माल्य काढणे ४०

४ ऐ. आचमन, प्राणायाम, देशकाल उच्चार, संकल्प अन् न्यास ४७

४ ऐ १. आचमन आणि देशकाल यांचे महत्त्व ४७

४ ओ. कलश, शंख, घंटा आणि दीप यांची पूजा करणे ५२

४ ओ १. कलश, शंख, घंटा व दीप यांची या क्रमाने पूजा का करतात ? ५२

४ ओ ३. उपकरणांवर गंध, अक्षता आणि फूल एकत्रितपणे का वहावे ? ५३

४ औ. पूजासाहित्य आणि पूजास्थळ यांची अन् स्वतःची शुद्धी ५७

४ अं. देवतांच्या मूर्ती आणि चित्रे यांची स्वच्छता ५९

**५. पूजकाने पूजासाहित्याची रचना स्वतःच्या जवळ करणे का योग्य ? ६३**

**६. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी केवळ देवपूजा नाही, तर त्यापुढील टप्प्याची साधना करणे आवश्यक ६४**

**७. देवतांचे विडंबन रोखणे, ही काळानुसार आवश्यक उपासना ! ६५**

**卐 काही आनुषंगिक सूत्रे ६४**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ७१**

## वाचकांना निवेदन !

‘या ग्रंथात सूक्ष्म परीक्षण, सूक्ष्म ज्ञानाविषयीची चित्रे ‘महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया’च्या सौजन्याने घेतली आहेत.’ – **प्रकाशक**

## मनोगत

नित्य ईश्‍वरोपासना घडावी यासाठी धर्माने घालून दिलेली एक सोपी आचारपद्धत म्हणजे 'देवपूजा'. देवपूजेमुळे मनात भक्तीभावाचे केंद्र निर्माण होते, देवतेची कृपादृष्टी होते, घरातील वातावरण सात्त्विक बनते, तसेच भावी पिढीवर धार्मिकतेचा संस्कार होण्यासही साहाय्य होते. देवपूजेपूर्वीची सिद्धता (तयारी) हा देवपूजेचा पाया आहे. देवपूजेपूर्वीच्या सिद्धतेमुळे पूजकाची शुद्धी तर होतेच, तसेच तो पूजेतून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करण्यास समर्थ बनतो; म्हणूनच देवपूजेची सिद्धता (तयारी) अत्यावश्यक आहे.

धार्मिक कृती हा एक प्रकारे अध्यात्मशास्त्रातील वैज्ञानिक प्रयोगच असतो. कोणताही प्रयोग करायचा असेल, तर तो नेमक्या पद्धतीने करावा लागतो. धार्मिक कृतीच्या संदर्भातही असेच आहे. योग्य पद्धतीने धार्मिक कृती केली, तरच आपल्याला योग्य फलप्राप्ती होते त्यासाठी धार्मिक कृतीमागील शास्त्र जाणून घेणेही तेवढेच महत्त्वाचे ठरते. शास्त्र जाणून घेऊन कृती केल्यामुळे श्रद्धेची निर्मिती होते. तसेच 'सत्कर्म जर अशास्त्रीय पद्धतीने केले, तर त्या कर्मामुळे अल्पांशाने का होईना मिळणारे फळ अशास्त्रीय लोकांना मिळते', असे धर्म सांगतो. यासाठी धार्मिक कृती शास्त्रानुसार होणेच आवश्यक ठरते. वरील दृष्टीकोन समोर ठेवून या ग्रंथात देवपूजेपूर्वीची सिद्धता (तयारी) आणि तिच्यामागील अध्यात्मशास्त्र यांसंबंधी विवेचन केले आहे.

पूजेपूर्वी स्तोत्रपठण, मंत्रजप किंवा नामजप करण्याचे महत्त्व; पूजास्थळ अन् उपकरणे यांची शुद्धी; देवतेच्या तत्त्वाशी संबंधित रांगोळी काढणे; देवपूजेला बसण्यासाठी घ्यावयाच्या आसनांचे विविध प्रकार; देवतांवरील निर्माल्य काढण्याची, तसेच देवतांची चित्रे आणि मूर्ती पुसण्याची योग्य पद्धत इत्यादी माहितीसह प्रत्यक्ष पूजेला प्रारंभ करण्यापूर्वी आचमन,

प्राणायाम, देशकाल उच्चार, संकल्प आणि न्यास करण्याचे, तसेच कलश, शंख, घंटा अन् दीप यांच्या पूजनाचे महत्त्वही या ग्रंथात सांगितले आहे.

या ग्रंथाच्या वाचनाने पूजेपूर्वीच्या सिद्धतेचे महत्त्व पूजकाच्या लक्षात येऊन त्याच्याकडून ती भावपूर्ण होवो आणि त्यामुळे त्याला पूजेतून अधिकाधिक चैतन्याची प्राप्ती होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति' या उपाध्यांनी संबोधले जात आहे. त्यामुळे त्यापूर्वीच्या लिखाणात त्यांच्या नावाच्या आरंभी 'श्रीसत्‌शक्ति' किंवा 'श्रीचित्‌शक्ति' ही उपाधी लावलेली नाही. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.